दहीहंडी या उत्सवाचा क्रीडा प्रकारात
समावेश करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक : विकाक २८१५/प्र.क्र.८/क्रीयुसे १,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ११ फेब्रुवारी, २०१५.

**प्रस्तावना**

गोकुळाष्टमी म्हणजेच दहीहंडी हा उत्सव महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा जपणारा एक महत्वाचा सण आहे. सदर उत्सव राज्यामध्ये मोठया प्रमाणात साजरा करण्यात येत असून यामध्ये युवक/ युवतींचा मोठया प्रमाणात सहभाग असतो. दहीहंडी या उत्सवाचा क्रीडा प्रकारामध्ये समावेश करण्याबाबत शासनाकडे वेळोवेळी विविध स्तरावरुन मागणी करण्यात येत होती. डिसेंबर २०१४ च्या हिवाळी अधिवेशनामध्ये विधीमंडळामध्ये काही सदस्यांनी दहीहंडीचा समावेश क्रीडा प्रकारामध्ये करण्याबाबत मागणी केली होती. त्या संदर्भात चर्चा करताना मा.मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा यांनी दहीहंडी या खेळाचा समावेश साहसी खेळामध्ये करण्याबाबत निर्णय घेण्याच्या दृष्टीने विधीमंडळ सदस्य, तज्ञ व्यक्तींचा अंर्तभाव असलेली समिती गठीत करण्याबाबत आश्वासन दिले होते. त्या अनुषंगाने या संदर्भात पुढील कार्यवाही करण्याच्या दृष्टीने शिफारसी करण्याकरिता समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय**

उपरोक्त पार्श्वभूमीवर दहीहंडी या खेळाचा समावेश साहसी क्रीडा प्रकारात करण्याच्या दृष्टीने शासनास शिफारसी करण्याकरिता खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यास याव्दारे मान्यता देण्यात येत आहे :-

१) ॲड.आशिष शेलार - अध्यक्ष
२) श्री.प्रताप सरनाईक - सदस्य
३) श्री.जितेंद्र आव्हाड - सदस्य
४) सहसचिव,विधी व न्याय विभाग - सदस्य
५) उप सचिव, महिला व बालविकास विभाग - सदस्य
६) पोलीस उपआयुक्त,कायदा व सुव्यवस्था,मुंबई - सदस्य
७) उप आयुक्त,बृहन्मुंबई महानगरपालिका - सदस्य
८) श्री.अनंत विनायक सावंत(दहीहंडी संघटन तज्ञ) - सदस्य
९) श्री.अरुण मधुकर बागकर(दहीहंडी संघटन तज्ञ) - सदस्य
१०) श्री.जगदीश तुकारात साळवी(साहसी खेळ तज्ञ) - सदस्य

११) आयुक्त, क्रीडा व युवक सेवा - सदस्य सचिव

उपरोक्त समितीचे अध्यक्ष आवश्यकतेनुसार तज्ञ व्यक्ती / मान्यवरांना निमंत्रित करु शकतील.

**समितीची कार्यकक्षा**

उपरोक्त समिती दहीहंडी या उत्सवाचा समावेश साहसी क्रीडा प्रकारामध्ये करण्याच्या दृष्टीने स्पर्धा आयोजनाची पध्दत, दहीहंडी संदर्भात मा.उच्च न्यायालय तसेच मा.सर्वोच्च न्यायालय येथे दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेच्या अनुषंगाने संबंधित न्यायालयानी दिलेल्या आदेशांचे पालन करण्याच्या दृष्टीने करावयाच्या उपाययोजना, साहसी खेळासाठी करावयाचे नियम, दहीहंडी या साहसी क्रीडा प्रकारात भाग घेणाऱ्या क्रीडापटूंना द्यावयाच्या सोयी-सुविधा इ. विविध बाबी विचारात घेऊन नियमावली तयार करण्याबाबत शासनास शिफारसी सादर करणे.

**समिती कालावधी**

उक्त समिती आपला अहवाल शासनास ३ महिन्यामध्ये सादर करील.

उपरोक्त समितीवर नियुक्त करण्यात आलेल्या अशासकीय सदस्यांना वित्त विभाग शासन निर्णय क्र.प्रवास १०१०/प्र.क्र.२/सेवा-५, दिनांक ३ मार्च, २०१० च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार रु.८,९००/- व त्याहून ग्रेडवेतन असणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या दराने प्रवासभत्ता व दैनिकभत्ता अनुज्ञेय असेल. मात्र, त्यांना विमानप्रवास आणि रेल्वेच्या वातानूकुलित प्रथम वर्गाचा प्रवास अनुज्ञेय असणार नाही. या संदर्भात होणारा खर्च क्रीडा व युवक सेवा संचालनालय याकरिता उपलब्ध असणाऱ्या तरतूदींतून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०२१३१४३१०७०६२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Sudhir Narhar Joshi

Digitally signed by Sudhir Narhar Joshi
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education & Sports Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Sudhir Narhar Joshi
Date: 2015.02.13 14:41:05 +05'30'

**( सु.न.जोशी )**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत ,**

१) ॲड.आशिष शेलार, वि.स.स., ६०२, हायलँड कोर्ट, सी विंग, बाझार रोड, वांद्रा (प.) , मुंबई ४०० ०५१.

२) श्री.प्रताप सरनाईक, वि.स.स.,बी-१/बी-२, विहंग गार्डन, रेमंड कंपनीसमोर,विहंगधाम क्लबजवळ,पोखरण रोड नं.१ ठाणे (प.) ४०० ६०६

३) श्री.जितेंद्र आव्हाड, वि.स.स.,सी-१०,११ विश्वजित सोसायटी, वीर सावरकर पथ, नौपाडा, ठाणे (प.) ४०० ६०२.

४) मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

५) प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.

६) श्री.अनंत विनायक सावंत, शिंफोणी को.ऑ.हौ.सो.लि.,प्लॉट नं.५०१, गणेशनगर, मालाड मार्वे रोड,चारकोप, कांदिवली (प.), मुंबई ४०० ०६७.

७) श्री.अरुण मधुकर बागकर, बी.आय.टी.चाळ नं.४, रुम नं.३३-३४, पहिला मजला, माझगांव, सेंट मेरी रोड,मुंबई ४०० ०१०.

८) श्री.जगदीश तुकाराम साळवी, बी.आय.टी.चाळ नं.७, रुम नं.४७, दुसरा मजला, माझगांव, सेंट मेरी रोड, मुंबई ४०० ०१०.

९) आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे.

१०) सहसचिव,विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.

११) उप सचिव, महिला व बालविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

१२) पोलीस उपआयुक्त,कायदा व सुव्यवस्था,मुंबई शहर/उपनगर.

१३) उप आयुक्त,बृहन्मुंबई महानगरपालिका,मुंबई.

१४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.

१५) महालेखापाल (लेखा व परिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.

१६) नियोजन विभाग (का.१४७१), मंत्रालय, मुंबई.

१७) वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई.

१८) सर्व उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा (क्रीडा संचालनालयामार्फत)

१९) मा.मंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

२०) अध्यक्ष, महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन, पुणे. (क्रीडा संचालनालयामार्फत)

२१) अवर सचिव, (क्रीयुसे - २, क्रीयुसे -३) / निवडनस्ती, क्रीयुसे-१.